# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : ३ ऑगस्ट २०२१

## ( बैठक क्र. ७६ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | आपदग्रस्तांना वाढीव दराने मदत; कायमस्वरुपी धोरण आखण्याचे मुख्यमंत्र्याचे निर्देश<br>११ हजार ५०० कोटींच्या तरतूदीस मान्यता | मदत व पुनर्वसन |
| २ | जालना येथे होणार ३६५ खाटांचे प्रादेशिक मनोरुग्णालय | सार्वजनिक आरोग्य |
| ३ | कृषी विद्यापीठांतील अध्यापकांना ७ वेतन आयोग | कृषी |
| ४ | जयसिंगपूर नगरपरिषदेस वस्तुसंग्रहालय व ग्रंथालयासाठी जमीन देण्याचा निर्णय | महसूल |

## आपदग्रस्तांना वाढीव दराने मदत ; कायमस्वरुपी धोरण आखण्याचे मुख्यमंत्र्याचे निर्देश

## ११ हजार ५०० कोटींच्या तरतूदीस मान्यता

राज्यातील विविध जिल्हयात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसंदर्भात आज राज्य मंत्रिमंडळाने ११ हजार ५०० कोटी रुपये इतक्या तरतुदीस मान्यता दिली असून, यामधून मदत, पुनर्बांधणी व आपत्ती सौम्यीकरण यावर खर्च केला जाईल. आपत्तीग्रस्त नागरीकांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दरापेक्षा वाढीव दराने मदत करण्यात येईल. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.

या निधीपैकी मदतीसाठी १५०० कोटी रुपये, पुनर्बांधणीसाठी ३००० कोटी व बाधित क्षेत्रात सौम्यीकरण उपाययोजनांसाठी ७००० कोटी खर्चास देण्यास मान्यता देण्यात आली.

**सानुग्रह अनुदान**:- कुटुबांना कपडे तसेच घरगुती भांडी/वस्तु यांचे नुकसानीकरिता ४८ तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी क्षेत्र पाण्यात बुडले असण्याची अट शिथिल कन ५०००/- रुपये प्रतिकुटुंब , कपडयांचे नुकसानीकरिता आणि ५०००/- रुपये प्रतिकुटुंब, घरगुती भांडी/वस्तु यांच्या नुकसानीकरिता देण्यात येईल.

**पशुधन नुकसान - दुधाळ जनावरे** -- ४०,०००/- रुपये प्रति जनावर, ओढकाम करणारी जनावरे- ३०,०००/- प्रति जनावर, ओढकाम करणारी लहान जनावरे-२०,०००/- प्रति जनावर, मेंढी/बकरी/डुकर- ४०००/- (कमाल ३ दुधाळ जनावरे किंवा कमाल ३ ओढकाम करणारी जनावरे किंवा कमाल ६ लहान ओढकाम करणारे जनावरे किंवा कमाल ३० लहान दुधाळ जनावरे प्रति कुटुंब या मर्यादेत). कुक्कुटपालन पक्षी- रु ५०/- प्रति पक्षी, अधिकतम रु ५०००/- रुपये प्रति कुटुंब.

**घरांच्या पडझडीसाठी मदत** :- पूर्णत: नष्ट झालेल्या पक्क्या/कच्च्या घरांसाठी १,५०,०००/- रुपये प्रति घर. अंशत: पडझड झालेल्या (किमान ५०%) पक्क्या/कच्च्या घरांसाठी मदत ५०,०००/- प्रति घर . अंशत: पडझड झालेल्या (किमान २५ %) पक्क्या/कच्च्या घरांसाठी मदत २५,०००/- प्रति घर . अंशत: पडझड झालेल्या (किमान १५ %) कच्च्या/ पक्क्या घरांसाठी रु १५,०००/- प्रति घर. नष्ट झालेल्या झोपडया रु १५,०००/- प्रति झोपडी. ( शहरी भागात मात्र ही मदत घोषित केलेल्या झोपडपट्टी पट्टयातील पुनर्वसनासाठी पात्र असलेल्या झोपडयासाठी देय राहील. गामीण भागात अतिक्रमित झोपडी जे नियमितीकरणास पात्र आहेत पण अद्याप नियमितीकरण झालेली नाहीत ती पात्र राहतील ).

**मत्य बोटी व जाळयांसाठी अर्थसहाय्य** :- अंशत: बोटीचे नुकसान - १०,०००/- रुपये, बोटींचे पुर्णत : नुकसान - २५,०००/-.जाळयांचे अंशत: नुकसान- ५०००/-, जाळयांचे पुर्णत: नुकसान- ५०००/- रुपये.

**हस्तकला/कारागीरांना अर्थसहाय्य** :- जे स्थानिक रहिवाशी आहेत, ज्यांचे नाव स्थानिक मतदार यादीत आहे व जे रेशनकार्ड धारक आहेत त्यांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त ५०,०००/- रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली. हस्तकला व हातमाग कारागीर यामध्ये बारा बलुतेदार, मुर्तीकार इत्यादी यांचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आली.

**दुकानदार यांना अर्थसहाय्य** :- जे स्थानिक रहिवाशी आहेत, ज्यांचे नाव स्थानिक मतदार यादीत आहे व जे रेशनकार्ड धारक आहेत अशा दुकानदारांपैकी अधिकृत दुकानदार यांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त .५०,०००/- रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली.

**टपरीधारकांना अर्थसहाय्य** :-जे स्थानिक रहिवाशी आहेत, ज्यांचे नाव स्थानिक मतदार यादीत आहे व जे रेशनकार्ड धारक आहेत अशा टपरीधारकांपैकी अधिकृत टपरीधारकांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त १०,०००/- रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली.

**कुक्कुटपालन शेडकरिता अर्थसहाय्य** :- कुक्कुटपालन शेडच्या नुकसानीसाठी ५०००/- रुपये इतकी मदत देण्यास मान्यता देण्यात आली.

## सर्वंकष, कायमस्वरुपी धोरण आखा – मुख्यमंत्री

या बैठकीत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. ते असे, दरड प्रवण क्षेत्रातील तसेच निळया रेषेच्या आतील नागरिकासंदर्भात सर्वंकष कायमस्वरुपी योग्य धोरण आखण्यात यावे. पूराची वारंवारिता वाढत आहे. त्यामुळे प्रशासनातील अधिकारी व या क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती यांची समिती गठीत कन त्याचा अभ्यास करण्यात यावा. तसेच या अभ्यासामध्ये राष्ट्रीय जल विकास अभिकरण (NWDA) या संस्थेचा सहभाग घेण्यात यावा. या अभ्यासाचा अहवाल मंत्रिमंडळास सादर करण्यात यावा. महाड आणि चिपळूण या क्षेत्रातील गंधारी, सावित्री, वशिष्ठी या नदयांच्या खोली करणाचे व नदी पात्रात सुधारणा करण्याचे व पूर संरक्षक भिंती बांधण्याबाबत सखोल अभ्यास कन शास्त्रोक्त पध्दतीने पुढील ३ वर्षात याबाबत कार्यक्रम राबविण्यात यावा. एककालिक आधारसामग्री अधिग्रहण प्रणाली ( Real Time Data Acquisition System) ही प्रणाली पुढील तीन महिन्यात उभी करण्यात यावी.

-----०-----

## जालना येथे होणार ३६५ खाटांचे प्रादेशिक मनोरुग्णालय

जालना येथे ३६५ खाटांचे प्रादेशिक मनोरुग्णालय उभारण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते. यामुळे मराठवाडा व विदर्भातील रुग्णांसाठी उपचारांची सुविधा उपलब्ध होणार आहे.

सध्याच्या बदलत्या जवीनशैलीमुळे, दैनंदिन जीवनामधील कामाचा तणाव, वेगवेगळ्या कौटुंबिक व आर्थिक अडचणी असे अनेक कारणीभूत घटकामुळे मनोरुग्णांचा किंवा मानसिक आजाराच्या प्रमाणामध्ये झपाट्याने वाढ होत आहे. राज्यात चार प्रादेशिक मनोरुग्णालये पुणे, ठाणे, नागपूर व रत्नागिरी येथे कार्यरत आहेत. मराठवाडा विभागासाठी एकही प्रादेशिक मनोरुग्णालय कार्यरत नाही. मराठवाड्यातील मनोरुग्णांची आकडेवारी बघता असे दिसून येते की, दरमहा अंदाजे १००० ते १२०० मानसिक रुग्णांवर उपचार केले जात आहेत. जालना जिल्हा हा मराठवाडा व विदर्भातील किमान १० जिल्ह्यांच्या मध्यवर्ती असलेले शहर आहे. मराठवाड्याच्या रुग्णांना उपचाराकरिता प्रादेशिक मनोरुग्णालय, पुणे अथवा नागपूर येथून उपचार घेतल्याशिवाय पर्याय नाही. जालना ते पुणे चे अंतर २९५ कि.मी तर जालना ते नागपूर चे अंतर ४१७ कि.मी असल्याने या प्रवासात रुग्णांची व त्यांच्या नातेवाईकांचे खूप हाल होतात. महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाडा या क्षेत्रातील शेतक-यांच्या आत्महत्या व मानसिक समस्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता, जालना येथे त्वरीत प्रादेशिक मनोरुग्णालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.

सध्या जालना या ठिकाणी शासकीय किंवा खाजगी जागा भाडेतत्वावर घेवून प्रादेशिक मनोरुग्णालय त्वरीत सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. जालना येथे ३६५ खाटांचे प्रादेशिक मनोरुग्णालयासाठी आवश्यक मनुष्यबळ करीता पदनिर्मिती करण्यास तसेच औषधे व यंत्रसामुग्री खरेदी करण्यास देखील मान्यता देण्यात आली आहे.

-----o-----

कृषी विभाग

## कृषी विद्यापीठांतील अध्यापकांना ७ वेतन आयोग

राज्यातील कृषी विद्यापीठांमधील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.

राज्यातील कृषी विद्यापीठे संलग्न कृषी महाविद्यालये यामधील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाची सुधारित वेतन संरचना १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली.

-----o-----

महसूल विभाग

## जयसिंगपूर नगरपरिषदेस वस्तुसंग्रहालय व ग्रंथालयासाठी जमीन देण्याचा निर्णय

जयसिंगपूर नगरपरिषदेस वस्तुसंग्रहालय व ग्रंथालय उभारणीसाठी जमीन देण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.

कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूर (ता. शिरोळ) नगरपरिषदेस वस्तुसंग्रहालय व ग्रंथालय उभारणीसाठी जमिनीची आवश्यकता होती. त्यासाठी जयसिंगपूर येथील सि. स. नं. २३५७अ/१अ/१ क्षेत्र २१०८ चौ. मी. ही शासकीय जमीन विनामुल्य देण्यास मान्यता देण्यात आली.

-----o-----